॥ सा विद्या या विमुक्तये ॥

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड — Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

| Fax (02462) 215572 | Knowledge Resource Center | www.srtmun.ac.in |
|---|---|---|
| Phone : (02462) 215246 | | email: krc@srtmun.ac.in |


जा. क्र. ज्ञा.स्रो. के./२०२६-२७/५५६ — दि. २५ ऑगस्ट २०२६

**मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व विद्यापीठ वर्धापन दिन सप्ताह, २०२६ निमित्त 'भित्तीपत्रक स्पर्धा' आयोजनाबाबत**

# ***परिपत्रक***

**संदर्भ:**

१. दि.०७ ऑगस्ट,२०२५ रोजीच्या मा.व्यवस्थापन परिषद बैठक क्र.११० मधील ठराव क्र.१ (२)
२. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त आयोजित करावयाच्या विविध उपक्रम / कार्यक्रमासाठी गठीत समिताच्या दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त
३. जा. क्र. आस्था/०२/२०२६-२७/७१ दि. १८ ऑगस्ट २०२६

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त दि. ०७ सप्टेंबर, २०२६ ते २३ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत 'मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन सप्ताह' साजरा करण्यात येणार असून त्यात विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या अंतर्गत **दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक १०:००** वा. विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्रात **भित्तिपत्रक** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा विषय **"मराठवाडा मुक्तीसंग्राम किंवा विद्यापीठाचा वैभवशाली इतिहास"** असा आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी विषयाला अनुसरून आकर्षक आणि माहितीपूर्ण भित्तीपत्रके तयार करून प्रदर्शित करावयाची आहेत. या स्पर्धेतील विजेत्यांना खालीलप्रमाणे पारितोषिके दिली जातील.

**प्रथम क्रमांक**: प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, आणि रोख रक्कम रु. ३१००/-
**द्वितीय क्रमांक:** प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, आणि रोख रक्कम रु. २१००/-
**तृतीय क्रमांक:** प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, आणि रोख रक्कम रु. १५००/-

स्पर्धेचे नियम व अटी सोबत दिल्या असून या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, तसेच विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्राचार्य, संचालक, अध्यापकांनी प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

25.08.2026

**(डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी)**
**प्र.संचालक, ज्ञान स्रोत केंद्र**

**प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:**

१. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
२. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
३. संचालक, विद्यापीठ उप-परिसर लातूर व परभणी
४. संचालक तथा विभागप्रमुख, प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
५. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
६. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट
७. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ (प्रसिद्धीसाठी)
८. सिस्टीम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी)

**प्रत माहितीस्तव;**

१. मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र- कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
[illegible] कार्यालय प्रस्तुत विद्यापीठ

॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax (02462) 215572 | Knowledge Resource Center | www.srtmun.ac.in
Phone : (02462) 215246 | email: krc@srtmun.ac.in

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन सप्ताह

## *भित्तीपत्रक स्पर्धा:* नियम व अटी

१. ही स्पर्धा केवळ प्रस्तुत विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित संस्था व महाविद्यालयात २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यासाठी आहे.

२. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, संकुलाचे संचालक यांचे शिफारस पत्र अनिवार्य असेल.

३. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, प्रत्येक स्पर्धकाला आपले नाव, वर्ग, आणि संपर्क क्रमांक नोंदणी अर्जावर व भित्तीपत्रकावर नोंदविणे अनिवार्य आहे.

४. भित्तिपत्रकासाठी A2 (420 x 594 मिमी) आकाराचा, जाड, उत्तम प्रतीचा कागद वापरणे अपेक्षित आहे.

५. भित्तिपत्रक हाताने तयार केलेले/ छपाई/ डिजिटल प्रिंटिंग असावे.

६. चित्रांसाठी रंग, पेन्सिल, क्रेयॉन्स किंवा इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करता येईल.

७. मजकूर सुवाच्य आणि आकर्षक असावा.

८. विषयाशी सुसंगतता, नाविन्यता आणि सर्जनशीलता, कलात्मकता, माहितीची अचूकता इत्यादी निकषावर भित्तीपत्रकाचे मुल्यांकन केले जाईल.

९. भित्तीपत्रक एक किंवा जास्तीत जास्त तीन विद्यार्थी एकत्र येऊन तयार करू शकतात.एकाहून अधिक विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रक तयार केले तरी ती एकच प्रवेशिका समजली जाईल.

१०. परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

११. या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

१२. स्पर्धेत बदल किंवा कोणतेही कारण न देता स्पर्धा रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

१३. स्पर्धकांनी वेळेपूर्वी किमान एक तास उपस्थित राहून आपले भित्तीपत्रक प्रदर्शित करावायचे आहे.

१४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवास किंवा कोणताही भत्ता देय असणार नाही.

१५. विद्यापीठ / महाविद्यालयाचे चालू शैक्षणिक वर्षातील अधिकृत छायाचित्रासह ओळखपत्र सोबत ठेवणे अनिवार्य राहील.

१६. परिपत्रकात दिलेल्या क्यू आर कोड वरून दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सांयकाळी ५ वाजेपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य आहे.